आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१८ सप्टेंबर २०२५ - गुरूवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशभरातल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी आवश्यक असलेला निधी केंद्र सरकार देईल, असं केंद्रीय अर्थमंत्र्यांचं आश्वासन

- देशभरातल्या संपूर्ण मतदान प्रक्रियेत घोटाळा झाल्याचा काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा आरोप केंद्रीय निवडणूक आयोगाने फेटाळला

- चायना मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत पी. व्ही. सिंधूचा उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

**आणि**

- ज्येष्ठ इतिहास संशोधक गजानन मेहेंदळे यांच्या पार्थिवावर पुण्यात अंत्यसंस्कार

**<><><><><>**

सर्व राज्यांमधल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना अर्थात आटीआयना कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित केंद्रांमध्ये अद्ययावतीकरण करण्यासाठी गरजेचा असलेला निधी केंद्र सरकार देईल, असं आश्वासन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी दिलं. त्या आज नवी दिल्ली भारतीय गुणवत्ता व्यवस्थापन फाउंडेशनच्या परिसंवादात बोलत होत्या. उद्योगविश्वाच्या बदलत्या गरजांशी जुळवून घेण्यासाठी आयटीआयचा कायापालट होत असल्याचं त्या म्हणाल्या. गेल्या दोन ते तीन अर्थसंकल्पांमध्ये नागरिकांच्या कौशल्य विकासासाठी सरकारनं तरतुदी केल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

देशभरातल्या मतदान प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात घोटाळा झाल्याचा आरोप लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज पुन्हा नवी दिल्लीत वार्ताहर परिषद घेऊन केला. यासाठी त्यांनी महाराष्ट्रातल्या राजुरा आणि कर्नाटकातल्या आळंद विधानसभा मतदार संघातली उदाहरणं उपस्थितांच्या समोर मांडली.

बनावट अर्ज, काही सॉफ्टवेअर वापरुन मतदारांची नावं वगळणं, बोगस मतदार घुसवणं हे प्रकार झाल्याचा दावा त्यांनी केला.

राजुरा मतदारसंघात ६ हजार ८५० मतचोरी झाल्याप्रकरणी पोलिसांनी एफआयआरही दाखल केल्याचा दावा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.

दरम्यान, राहुल गांधी यांनी केलेले सर्व आरोप हे निराधार असल्याचं केंद्रीय निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. ऑनलाइन पद्धतीने मतदारांना वगळता येत नसल्याचं स्पष्टीकरण आयोगानं दिलं आहे. २०२३ मध्ये आळंद मतदारसंघातून काही मतदारांना अवैधरित्या वगळण्याचे प्रयत्न झाले होते. याप्रकरणी निवडणूक आयोगाच्या प्रतिनिधींनी एफआयआर दाखल केला होता, असं निवडणूक आयोगानं कळवलं आहे. २०१८ मध्ये या मतदारसंघातून भाजपा तर २०२३ मध्ये काँग्रेस उमेदवार जिंकून आला होता.

राहुल गांधी संवैधानिक संस्थांवर सातत्यानं आरोप करुन लोकशाहीला कमकुवत करत आहेत. तसंच नागरिकांची ही दिशाभूल करत असल्याची टीका भाजपचे ज्येष्ठ नेते अनुराग ठाकूर यांनी केली.

पुरावे नसल्यानं मतचोरीच्या मुद्द्यावर राहुल गांधींना कायदेशीर लढाई लढायचीच नाही. केवळ मतचोरी झाली असा कांगावा करत देशभर राळ उडवून द्यायचा त्यांचा उद्देश असल्याचं भाजपा प्रवक्ते केशव उपाध्ये म्हणाले.

**<><><><><>**

सेवा आणि सुशासनाच्या मार्गावरून चालताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार देशाच्या सर्व समावेशक प्रगतीसाठी प्रयत्नशील आहे. सरकारच्या प्रयत्नांमुळे कृषी क्षेत्रात सुधारणा होत असून शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही वाढ होत आहे. अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**होल्ड... व्हॉईस कास्ट**

*(प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशातील कृषी क्षेत्राचं क्षितिज आणखी विस्तारत आहे. शेतीपूरक विविध उद्योगांच्या माध्यमातून ग्रामीण कुटुंबांना उत्पन्नाचे नवे स्रोत उपलब्ध होत असून त्यांचं भविष्य सुरक्षित होण्यासाठी हे कृषी आधारित उद्योग सहाय्यभूत ठरत आहेत. धान्य पिकांबरोबरच फळे, भाजीपाला, मसाले, दुध आणि दुग्धजन्य पदार्थ, मत्स्यउत्पादन, पशुपालन यासारख्या शेतीपूरक उद्योगांना केंद्र सरकारने दिलेलं पाठबळ शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे.)*

**<><><><><>**

जीएसटी प्रणालीत सुधारणा करण्याची घोषणा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून केली होती. त्यानुसार, जीएसटी परिषदेनं अनेक वस्तू आणि सेवा क्षेत्रांमधले जीएसटीचे दर कमी केले आहेत. आज जाणून घेऊ या, वस्त्रोद्योगाबद्दल...

**होल्ड व्हॉईस कास्ट**

*(केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे कृत्रिम धाग्यांवरील जीएसटी १८ टक्क्यांवरून ५ टक्के झाला तर कृत्रिम सुतावरचा कर १२ टक्क्यांवरून ५ टक्के झाला आहे. या दरकपातीमुळे कपड्यांच्या किमती कमी होणार आहेत. अडीच हजारापर्यंतच्या तयार कपड्यावरील जीएसटी ५ टक्के कमी केल्यानं मध्यमवर्गीय आणि गरीब घटकांसाठी वस्त्र खरेदी सुलभ होईल. भारताला जागतिक वस्त्रोद्योग केंद्र बनवण्याच्या दिशेनं देखील एक मोठं पाऊल असल्याचं मत या क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केलं.)*

**<><><><><>**

देशभरात संयुक्त पदवीधर पातळी परीक्षा २०२५ सुरळीतपणे सुरु असल्याचं कर्मचारी निवड आयोगानं म्हटलं आहे. यंदा १२ सप्टेंबर पासून देशाच्या १२९ शहरांमध्ये रोज तीन सत्रांमध्ये घेतल्या जात असलेल्या या परीक्षेला यंदा २८ लाखापेक्षा जास्त परीक्षार्थी बसल्याची माहिती आयोगाच्या अधिकाऱ्यांनी दिली. तसंच वैध कारणामुळे परीक्षा देता येणार नाही, अशा जवळजवळ एक हजार उमेदवारांच्या परीक्षेच्या तारखा पुन्हा निश्चित करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

शेन्झेन इथं सुरू असलेल्या चायना मास्टर्स सुपर 750 बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पीव्ही सिंधूनं आज थायलंडच्या पोर्नपावी चोचुवोंग हिचा सरळ गेममध्ये पराभव करून महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. सिंधूचा या स्पर्धेतला हा सलग दुसरा विजय आहे. उपांत्यपूर्व फेरीत तिचा सामना दक्षिण कोरियाच्या अन से यंग हिच्याबरोबर होईल.

**<><><><><>**

ज्येष्ठ इतिहास संशोधक आणि शिवचरित्रकार गजानन भास्कर मेहेंदळे यांच्या पार्थिवावर आज पुणे इथल्या वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. मेहेंदळे यांचं काल  हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झालं. ते ७८ वर्षांचे होते. गेली ५० वर्षं मेहेंदळे यांनी इतिहासाच्या संशोधन कार्याला वाहून घेतलं होतं. शिवचरित्र आणि युद्ध इतिहासाचे ते गाढे अभ्यासक होते. त्यांनी शिवचरित्रावर मराठी आणि इंग्रजी भाषेत साहित्यलेखन केलं आहे. त्यांनी ‘शिवाजी झाला नसता तर’, ‘टिपू ॲज अ ही रिअली वॉज’, ‘शिवाजी लाईफ अँड टाईम’, ‘शिवचरित्र’, ‘मराठ्यांचे आरमार’ अशी अनेक पुस्तके लिहिली आहेत. सध्या त्यांचे दुसऱ्या महायुद्धावरच्या पुस्तकाचे काम सुरू होतं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गजानन मेहेंदळे यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. मेहेंदळे यांचं लेखन हे प्रामुख्याने शिवरायांच्या युद्धशास्त्रावर आधारित होतं, शिवचरित्र इंग्रजीत लिहून त्यांनी दिलेलं योगदान निश्चितच मोठं असल्याचं मुख्यमंत्री आपल्या शोकसंदेशात म्हणाले आहेत.

**<><><><><>**

राज्यशासनाच्या ‘महाज्ञानदीप’ पोर्टलवर भारतीय ज्ञान प्रणालीवर आधारित पहिला ऑनलाईन अभ्यासक्रम खुला करण्यात आला आहे. हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना भारतीय ज्ञान परंपरेची मूलतत्त्व, विविध पैलू आणि आधुनिक काळातलं त्याचं महत्त्व समजावून सांगतो. हा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रासह २ क्रेडिट्स मिळणार असून जे त्यांच्या अकॅडेमिक बँक ऑफ

क्रेडिटमध्ये जमा होतील. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अनुसार, राज्यातल्या विद्यार्थ्यांना आपल्या मातृभाषेत आंतरराष्ट्रीय दर्जाचं शिक्षण देण्याच्या उद्देशानं हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे.

**<><><><><>**

नंदुरबारच्या जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांनी जुळ्या मुलांना अंगणवाडीत दाखल करुन नवीन उदाहरण सर्वांसमोर ठेवलं आहे. नंदूरबार शहरापासून ३-४ किलोमीटरवर असलेल्या टोकरतलाव इथल्या अंगणवाडीत त्यांनी मुलांना टाकलं आहे. या अंगणवाडीतल्या सेविका आणि मदतनीसांनी तयार करुन घेतलेल्या झोळीची कल्पना आवडल्यानं मुलांना या अंगणवाडीत दाखल केल्याचं जिल्हाधिकारी म्हणाल्या.

**- होल्ड - नंदूरबार बाइट - -**

**<><><><><>**

भारतीय वैद्यकीय संस्थेच्या डॉक्टरांनी पुकारलेल्या संपाला यवतमाळ जिल्ह्यातल्या डॉक्टरांनी दिलेल्या पाठींब्यामुळे जिल्ह्यातली रुग्णसेवा प्रभावित झाली आहे, असं डॉक्टरांनी सांगितलं. होमिओपॅथी पदवीधरांना महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेत नोंदणी करण्याची परवानगी दिल्यामुळे हा संप पुकारला आहे. जिल्ह्यातील आयएमए सदस्य, डॉक्टरांच्या सर्व नियमित आणि आपत्कालीन वैद्यकीय सेवा पूर्णपणे बंद आहे.

**<><><><><>**

**परभणी** जिल्ह्यात पाथरी तालुक्यातल्या  हदगाव आणि कासापुरी मंडळात आज सकाळी झालेल्या मुसळधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली. पाथरी

तालुक्यात गेला आठवडाभर मुसळधार पावसामुळे शेती आणि रस्त्यांचं मोठं नुकसान झालं आहे.

**वाशीम** जिल्ह्यात कारंजा तालुक्यात गेले काही दिवस पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक गावांमधल्या शेतात जाणाऱ्या रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. त्यामुळे विक्रीसाठी तोडलेल्या संत्र्यांची वाहतूक ठप्प झाली आहे. संत्र्याचं पीक सडत असून संत्रा उत्पादक शेतकरी अडचणीत आला आहे.

**<><><><><>**

परभणी इथल्या जिल्हाधिकारी कार्यालयात राज्यमंत्री तथा पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते सेलू आणि जिंतूर इथल्या दहा जणांना कुणबी जात प्रमाणपत्र वाटप करण्यात आलं आहे. आतापर्यंत जिल्ह्यात १३ हजार कुणबी जात प्रमाणपत्र वाटप करण्यात आले असून हैदराबाद गॅझेटमधील नोंदी सापडतील त्यानुसार जात प्रमाणपत्र वितरीत केलं जाईल, असं राज्यमंत्र्यांनी सांगितलं.

**//<><><><><>//**